# नि.दि.मु.क्र.६३/२०१८ मधील निशाणी क्र.६३ वरील आदेश
# (CNRNo.MHSI090003302018)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ यांचा जबाब वाचला. उर्वरीत प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केलेले नाही. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१७ यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन अवसान आदेश रद्द करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभयपक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१७ भिमसेन कोमुर्लेकर हे दि.२०/०७/२०१९ रोजी मयत झाले आहेत. सदर बाब वादीने शपथपत्र दाखल करुन पुष्टी दिली आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१७ हे मयत झाल्याची बाब नाकारलेली नाही. प्रस्तूतचा दावा हा वाटपाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ च्या अनुषंगाने दाव्याचे कारण शिल्लक राहते. परीणामी, दाव्याचे स्वरुप व अर्जात नमूद कारण लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.६३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादीने खर्च म्हणुन रु.४००/–(रूपये चारशे फक्त) प्रतिवादींना द्यावे.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.15 16:15:04 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)
दिनांक : १४/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.